| MHSN040000482025 | | |
|---|---|---|
| | दाखल दिनांक | १८/०१/२०२५ |
| | नोंदणी दिनांक | १८/०१/२०२५ |
| | निर्णय दिनांक | १३/०४/२०२६ |
| | कालावधी | ०१ व ०२ म २३दि |
| | **निशाणी नं.** | |

| | |
|---|---|
| | **<u>तदर्थ जिल्हा न्यायाधीश क्र.१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, इस्लामपूर यांचे न्यायालयात,</u>**<br>**पिठासीन अधिकारी –**<br>श्रीमती. ए. एच. काशीकर, सत्र न्यायाधीश |
| | निकाल दिनांक – १३/०४/२०२६ |
| | **सत्र खटला नं.३/२०२५** |
| | गु.र.नं.७७/२०२३<br>पोलीस स्टेशन – आष्टा<br>भा.द.वि. कलम ३०७, ३२३, ३२४, ५०४, ५०६, १४३, १४७ व १४८ सह १४९. |
| **फिर्यादी** | **महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे, आष्टा.** |
| तर्फे विधीज्ञ | सौ.एस.व्ही. पाटील, सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | १. मोहन वसंत कामीरे,<br>वय – ४५ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>२. सागर शामराव कामीरे,<br>वय – २९ वर्षे, व्यवसाय – शेती, |

| | |
|---|---|
| | ३. आनंदा उर्फ दादासो बाळासो गडदे,<br>वय – २७ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>४. लखन उर्फ स्वप्नील सोनाजी हाके,<br>वय – २६ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>५. विशाल उर्फ हाणमा संजय कामीरे,<br>वय – २५ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>६. बजरंग रामचंद्र कामीरे,<br>वय – ४२ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>७. संजयकुमार बळवंत कामीरे,<br>वय – ५० वर्षे, व्यवसाय – शेती,<br>सर्व रा.कारंदवाडी, ता.वाळवा, जि.सांगली. |
| **तर्फे विधीज्ञ** | श्री. व्ही.के. खरात |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०५/०४/२०२३ |
| प्रथम खबर नोंदविल्याचा दिनांक | ०६/०४/२०२३ |
| दोषारोप पत्र दाखल केल्याचा दिनांक | ०७/१२/२०२३ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २५/०३/२०२५ |
| पुरावा नोंदविणेस सुरुवात केल्याचा दिनांक | ०७/०१/२०२६ |
| न्यायनिर्णयास ठेवलेचा दिनांक | १३/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १३/०४/२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास त्याचा दिनांक | -- |

## आरोपीचा तपशील

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडलेचा दिनांक | दोषारोपाचा तपशील | दोषी किंवा निर्दोष | शिक्षेचा कालावधी | फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोहन वसंत कामीरे, | ०७/०४/२०२३ | २७/०४/२०२३ | भा.द.वि. ३०७, ३२३,३२४, ५०४,५०६ १४३, १४७ व १४८ सह १४९. | निर्दोष | – | -- |
| २ | सागर शामराव कामीरे, | ०७/०४/२०२३ | २७/०४/२०२३ | भा.द.वि. ३०७, ३२३, ३२४,५०४,५०६ १४३, १४७ व १४८ सह १४९. | निर्दोष | – | -- |
| ३ | आनंदा उर्फ दादासो बाळासो गडदे, | ०७/०४/२०२३ | २६/०४/२०२३ | भा.द.वि. ३०७, ३२३, ३२४, ५०४,५०६ १४३, १४७ व १४८ सह १४९. | निर्दोष | – | -- |
| ४ | लखन उर्फ स्वप्नील सोनाजी हाके, | ०७/०४/२०२३ | २६/०४/२०२३ | भा.द.वि. ३०७, ३२३, ३२४, ५०४,५०६ १४३, १४७ व १४८ सह १४९. | निर्दोष | – | -- |
| ५ | विशाल उर्फ हाणमा संजय कामीरे, | ०७/०४/२०२३ | २६/०४/२०२३ | भा.द.वि. ३०७, ३२३, ३२४, ५०४,५०६ १४३, १४७ व १४८ सह १४९. | निर्दोष | – | -- |
| ६ | बजरंग रामचंद्र कामीरे, | अटकपुर्व जामीन मंजूर | अटकपुर्व जामीन मंजूर | भा.द.वि. ३०७, ३२३, ३२४, ५०४,५०६ १४३, १४७ व १४८ सह १४९. | निर्दोष | – | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | संजयकुमार बळवंत कामीरे, | अटकपुर्व जामीन मंजूर | अटकपुर्व जामीन मंजूर | भा.द.वि. ३०७, ३२३, ३२४, ५०४,५०६ १४३, १४७ व १४८ सह १४९. | निर्दोष | – | -- |

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयातर्फे तपासलेल्या साक्षीदारांची यादी

अ. अभियोग पक्ष :

| सा.क्र. | नांव | तपशिल |
|---|---|---|
| १ | चेतन सर्जेराव सिध्द | फिर्यादी |
| २ | बाबासो सर्जेराव सिध्द | जखमी साक्षीदार |
| ३ | किरण पांडूरंग जाधव | पंच |
| ४ | महेश श्रीपती गायकवाड | तपासी अंमलदार |

ब. बचाव पक्षातर्फे साक्षीदार, असल्यास :

| सा.क्र. | नांव | तपशील |
|---|---|---|
| -- | नाही | -- |

क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :

| सा.क्र. | नांव | तपशील |
|---|---|---|
| -- | नाही | -- |

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय तर्फे दाखल कागदपत्रांची यादी

अ. अभियोग पक्षातर्फे दाखल कागदपत्र :

| क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | ३६ | प्रथम खबर अहवालावरील फिर्यादीची सही |
| २ | ३७ | वर्दीजबाबावरील फिर्यादीची सही |
| ३ | ४२ | आरोपी सागर शामराव कामीरे याच्या निवेदन पंचनाम्यावरील पंच साक्षीदाराची सही |
| ४ | ४३ | जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदाराची सही |

ब१. बचाव पक्षातर्फे दाखल कागदपत्राची यादी :

| क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| – | नाही | नाही |

ब२. बचाव पक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी

| क्र. | नि. क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | नि.पी–१ | घटनास्थळ पंचनामा |
| २ | नि.पी–२ | जखमीचे कपडे जप्ती पंचनामा |
| ३ | नि.पी–३ | आरोपीचे कपडे जप्ती पंचनामा |
| ४ | नि.पी–४ | जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ५ | नि.पी–५ | जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ६ | नि.पी–६ | डॉक्टरांनी पोलिस स्टेशन आष्टा यांना पाठवलेले पत्र |

| | | |
|---|---|---|
| ७ | नि.पी–७ | जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ८ | नि.पी–८ | तपासाचे लेखी आदेश |
| ९ | नि.पी–९ | आरोपी सागर याचा निवेदन पंचनामा |
| १० | नि.पी–१० | जप्ती पंचनामा |

क. न्यायालयातर्फे निशाणी :

| क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | नि.२६ | दोषारोप |
| २ | नि.४८ | अभियोग पक्षातर्फे पुरावा बंद केल्याची पुरसीस |
| ३ | नि.४९ ते ५५ | आरोपी क्र.१ ते ७ यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन |

ड. भौतिक वस्तू :

| क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| ... | नाही | नाही. |

## न्यायनिर्णय
## (दिनांक १३/०४/२०२६)

सर्व आरोपींवर भारतीय दंड विधान संहिता (संक्षिप्त मध्ये भा.द.वी.) कलम ३०७, ३२३, ३२४, ५०४, ५०६, १४३, १४७ व १४८ सह १४९ प्रमाणे खटला चालविण्यात आला.

**<u>सरकार पक्षाची केस</u>** –

२.     दिनांक ०५/०४/२०२३ रोजी फिर्यादी चेतन सर्जेराव सिध्द यांनी दिलेल्या वर्दी जबाबावरुन प्रस्तुत प्रकरणातील आरोपींचे विरुध्द गुन्हयाची नोंद करण्यात आली. त्यानुसार फिर्यादी यांचा भाऊ बाबासो सिध्द यांचा मेहुणा तानाजी कामीरे व आरोपी क्र.१ मोहन कामीरे याचा गडी अजित यांच्यात मेंढरांच्या तळावर जेवण आणण्याच्या कारणावरुन वाद झाला होता. फिर्यादी चेतन सिध्द व त्यांचा भाऊ बाबासो सिध्द अजित याला जाब विचारायला मेंढरांच्या तळावर गेले होते. याचा राग मनात धरुन आरोपी क्र.१ मोहन कामीरे, आरोपी क्र.२ सागर कामीरे, आरोपी क्र.३ आनंदा गडदे, आरोपी क्र.४ लखन उर्फ स्वप्नील हाके, आरोपी क्र.५ हाणमा उर्फ विशाल कामीरे, आरोपी क्र.६ बजरंग कामीरे व आरोपी क्र.७ संजयकुमार कामीरे यांनी फिर्यादीच्या घरासमोर येवून फिर्यादी व त्याच्या भावाला समान उद्दीष्टाने प्रेरीत होवून व बेकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ केली तसेच जीवंत ठेवणार नाही अशी धमकी दिली. आरोपी क्र.२ सागर यांनी त्याच्या हातातील लोखंडी गजाने दादासो याच्या डोक्यात मारले व आरोपी क्र.६ बजरंग तसेच आरोपी क्र.१ मोहन यांनी बाबासो याला काठीने मारहाण करुन त्याला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. फिर्यादी व त्यांचे वडील सर्जेराव बाबासो याला सोडवायला गेले असता आरोपींनी फिर्यादीला काठीने मारहाण केली व सर्जेराव यास ढकलून दिले. शिवाय सर्व आरोपींनी फिर्यादी व बाबासो यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली. म्हणुन आरोपींविरुध्द योग्य कारवाई होण्यासाठी फिर्यादीने पोलिस स्टेशन आष्टा येथे प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

३. या प्रकरणातील तपास व न्यायालयात चाललेली संपरिक्षा या संदर्भातील सर्व मजकुर वर नमुद रकान्यामध्ये नोंदविलेला आहे. म्हणून त्याची पुनरावृत्ती येथे करण्यात आली नाही.

४. सरकार पक्षाची केस व एकंदरीत परिस्थिती विचारात घेता खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

| क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक ०५/०४/२०23 रोजी रात्री १०.०० वाजेदरम्यान, फिर्यादी चेतन सर्जेराव सिध्द यांचे घरासमोर, कारंदवाडी, ता. वाळवा, जि.सांगली येथे, सर्व आरोपींनी, गुन्हा करण्याच्या हेतुने, गैरकायदेशीर जमाव केला, आणि त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड संहिता चे कलम १४३ प्रमाणे गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | .. नाही. |
| २ | उपरोक्त कालावधीत व ठिकाणी सर्व आरोपींनी, फिर्यादी व साक्षीदार यांना दुखापत करण्याच्या हेतुने गैरकायदेशीर जमाव करुन, दंगा केला, व त्यानुसार त्यांनी भारतीय दंड संहिता कलम १४७ नुसार गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | .. नाही. |

| | | |
|---|---|---|
| ३ | उपरोक्त कालावधीत व ठिकाणी सर्व आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना लोखंडी गज व काठ्या अशा प्राणघातक हत्यारानिशी दुखापत करण्याच्या हेतुने गैरकायदेशीर जमाव करुन, दंगा केला, व त्यानुसार त्यांनी भारतीय दंड संहिता कलम १४८ नुसार गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | .. नाही. |
| ४ | उपरोक्त कालावधीत व ठिकाणी सर्व आरोपींनी, गैरकायदेशीर जमाव करुन, फिर्यादी चेतन व त्याचा भाऊ बाबासो यांना लोखंडी गज व काठ्यांनी मारहाण करुन, त्यांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला व त्यानुसार त्यांनी भारतीय दंड संहिता कलम ३०७ सह १४९ नुसार गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | .. नाही. |
| ५ | उपरोक्त कालावधीत व ठिकाणी सर्व आरोपींनी गैरकायदेशीर जमाव करुन, फिर्यादी चेतन व त्याचा भाऊ बाबासो यांना लोखंडी गज व काठ्यांनी मारहाण करुन, स्वेच्छा पूर्वक, दुखापत केली व त्यानुसार त्यांनी भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह १४९ नुसार गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | .. नाही. |
| ६ | उपरोक्त कालावधीत व ठिकाणी सर्व आरोपींनी | .. नाही. |

| | | |
|---|---|---|
| | गैरकायदेशीर जमाव करुन, फिर्यादी चेतन व त्याचा भाऊ बाबासो यांना, स्वेच्छा पूर्वक, दुखापत केली व त्यानुसार त्यांनी भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह १४९ नुसार गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | |
| ७ | उपरोक्त कालावधीत व ठिकाणी सर्व आरोपींनी, गैरकायदेशीर जमाव करुन, फिर्यादी चेतन व त्याचा भाऊ बाबासो यांना हेतुपुरस्सर अपमानास्पद शब्द वापरुन त्याला सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास अथवा गुन्हा करण्यास उदयुक्त केले व त्यानुसार त्यांनी भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह १४९ नुसार गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | .. नाही. |
| ८ | उपरोक्त कालावधीत व ठिकाणी सर्व आरोपींनी, गैरकायदेशीर जमाव करुन, फिर्यादी चेतन व त्याचा भाऊ बाबासो यांना धमकविण्याच्या हेतुने व भयभित करण्याच्या हेतुने फौजदारीपात्र धाकदपटशा केला व त्यानुसार त्यांनी भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह १४९ नुसार गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | .. नाही. |
| ९ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ ते ८ बाबत –**

५. वरील सर्व मुद्दे परस्पर सलग्न असल्याने मुद्दयांच्या व पुराव्यांच्या यथोचित विश्लेषणासाठी सदर मुद्दांची चर्चा एकत्रीतरित्या करण्यात आली आहे.

६. प्रस्तुत खटल्यात कलम ३०७ भा.द.वी. खालील जिवे ठार मारण्याचा प्रयत्न हा सर्वात मोठा गुन्हा असून, त्या गुन्हयाच्या व सोबतच्या गुन्हयांच्या सिध्दतेकरिता आरोपींनी गैरकायदयाची मंडळी जमविली व हातात बेकायदेशीररित्या शस्त्र घेवून त्या शस्त्राद्वारे फिर्यादी व साक्षीदारांस स्वेच्छेने मारहाण करुन दुखापत पोहोचविली, तसेच शिवीगाळ करुन, धमकी देवून, फिर्यादीस सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास प्रवृत्त करणारी अपमानास्पद वागणुक दिली असे अभियोग पक्षाचे कथन आहे.

७. त्या संदर्भात अभियोग पक्षाने फिर्यादी चेतन सर्जेराव सिध्द तसेच जखमी साक्षीदार बाबासो सर्जेराव सिध्द, यांची साक्ष साक्षीदार क्र.१ व २ म्हणून नोंदविली. त्याचप्रमाणे जप्ती पंचनाम्याचा पंच साक्षीदार किरण जाधव याची साक्ष साक्षीदार क्र.३ म्हणुन नोंदवून सर्वात शेवटी तपासी अंमलदार सहायक पोलिस निरीक्षक महेश श्रीपती गायकवाड यांची साक्ष साक्षीदार क्र.४ म्हणुन नोंदवली.

८. साक्षीदार क्र.१ चेतन सर्जेराव सिध्द हे जखमी फिर्यादी असून,

साक्षीदार क्र.२ बाबासो सिध्द हे जखमी साक्षीदार आहेत. सदर दोन्ही साक्षीदारांच्या पुराव्यानुसार दि.०५.०४.२०२४ रोजी संध्याकाळी त्यांच्या घराच्या समोर दंगा सुरु झाला होता. म्हणुन ते दोघे वडीलांसह घराच्या बाहेर आले होते. त्यावेळी अज्ञात इसमांनी त्यांना दगड व काठ्यांनी मारहाण केली. सदर घटनेच्यावेळी अंधार असल्यामुळे ती मारहाण कोणी केली हे त्यांना समजू शकले नाही. सर्जेराव सिध्द यांना कृष्णामाई हॉस्पीटल व सांगली सिव्हील हॉस्पीटल तसेच सिनर्जी हॉस्पीटल येथे नेण्यात आले व फिर्यादी चेतन सिध्द यांनी पोलिस स्टेशन आष्टा येथे सदर घटनेबाबत फिर्याद दाखल केली. सदर साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यात त्यांना झालेली मारहाण आरोपींनी केली किंवा ही मारहाण साक्षीदार क्र.२ बाबासो सिध्द यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने करण्यात आली होती वा त्यावेळी त्यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात येवून काठी व दगड यांसारख्या घातक शस्त्रांनी मारहाण करण्यात आली होती असे कथन केले नाही. एकंदरीत पुराव्याचे वाचन करता, असे निदर्शनास येते की, सदर दोन्ही साक्षीदारांनी अभियोग पक्षाच्या कथनाला समर्थन दिलेले नाही व म्हणून वि. सरकारी वकीलांनी त्यांची उलट तपासणी घेतली. मात्र या उलटतपासणीतही सदर साक्षीदारांनी कुठलीही बाब सांगितली नाही. म्हणून साक्षीदार क्र.१ व २ यांच्या साक्षी या आरोपींवरील आरोप सिध्द करण्यास पुरेशा ठरल्या नाहीत असा निष्कर्ष मी काढला.

९. संचिकेचे वाचन केले असता, असे निदर्शनास येते की, अभियोग पक्षाने तपासलेल्या या साक्षीदारांनी आरोपींच्या उद्दीष्टांबाबत वा त्यांनी बेकायद्याची मंडळी जमवली होती याबाबत कुठलीच बाब नमूद केली

नाही. अभियोग पक्षाने तपासी अंमलदार सहायक पोलिस निरीक्षक महेश श्रीपती गायकवाड यांची साक्ष नि.४६ वर नोंदवली. परंतू ज्या फिर्यादीचा वर्दीजबाब त्यांनी नोंदविला वा ज्या साक्षीदारांचे जबाब त्यांनी नोंदविले, त्यांनीच अभियोग पक्षाला समर्थन दिले नसल्यामुळे तपासी अंमलदारांची साक्ष ही केवळ औपचारिक साक्ष ठरली. अभियोग पक्षाने नमूद केलेली घटना केवळ घटनेचा प्रत्यक्षदर्शी व परिस्थीतीजन्य साक्षीदारच सिध्द करु शकतो. तपासी अंमलदार केवळ जबाब व साक्ष यातील विसंगती, त्रुटी वा सुधारणा यांबाबत वा गोळा केलेल्या पुराव्यांबाबत साक्ष देवू शकतो. केवळ तपासी अंमलदारांच्या वा पंच साक्षीदारांच्या साक्षीद्वारे गुन्ह्यातील घटनाक्रम सिध्द होवू शकत नाही. साक्षीदार क्र.३ किरण जाधव यांनी देखील आरोपी सागर कामीरे याचा निवेदन पंचनामा व कथित जप्ती याबाबत साक्ष दिली. मात्र, सागर याने त्याच्या समक्ष निवेदन दिले नव्हते व त्या निवेदनाच्या अनुषंगाने गुन्ह्यातील हत्यारही काढून दिले नव्हते असे सांगितले. त्यामुळे पंचनाम्याच्या स्वतंत्र पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षाला समर्थन दिले नाही, असे दिसून येते. म्हणुन साक्षीदार क्र.१ ते ४ या साक्षीदारांच्या साक्षी अभियोग पक्षाने आरोपींवर लावलेले दोषारोप सिध्द करण्यासाठी पुरेशा नसल्याने मी त्या नाकारल्या.

१०. एकंदरीत पुराव्यांच्या अवलोकनावरुन मी या निष्कर्षापर्यंत पोहोचले की, फिर्यादी व जखमी साक्षीदार यांच्या साक्षी आरोपींचे वरील सर्व आरोप संशयाच्या पलीकडे जावून सिध्द करण्यासाठी सक्षम ठरल्या नाहीत. पंच साक्षीदार व तपासी अंमलदार यांच्या साक्षी केवळ औपचारीक असून पंच साक्षीदारानेही अभियोग पक्षाला समर्थन दिले नाही. आरोपींनी बेकायद्याची

मंडळी जमवली व समाईक उद्दीष्टाने प्रेरीत होवून वादातील गुन्हा केला, असे या सर्व साक्षीदारांच्या साक्षीद्वारे सिध्द झाले नाही. तसेच जप्त करण्यात आलेली हत्यारे साक्षीदारांना दाखवून जप्ती सिध्द करण्यात आलेली नाही. त्यामुळे अभियोग पक्षाला सर्व आरोपी विरुध्द लावणेत आलेले भा.द.वि. कलम ३०७, ३२३, ३२४, ५०४, ५०६, १४३, १४७ व १४८ सह १४९ खालील आरोप सबळ व निर्णायक पुराव्यानिशी सिध्द करता आलेले नाहीत, तसेच वर नमुद सर्व गुन्हयांचे आवश्यक ते घटक अभियोग पक्षाला सबळ व निर्णायक पुराव्यानिशी आरोपींचे विरुध्द सिध्द करता आले नाहीत असे अनुमान मी काढले. म्हणून मुद्दे क्र.१ ते ८ चे उत्तर मी **'नाही'** असे दिले.

**मुद्दा क्र.०९ बाबत –**

११. मुद्दे क्र.१ ते ८ च्या नकारार्थी निष्कर्षाअंती मी या निष्कर्षापर्यंत पोहोचले की, आरोपी क्र.१ ते ७ हे त्यांच्यावर लावण्यात आलेल्या सर्व दोषारोपातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे –

## आदेश

१ आरोपी क्र.१ मोहन वसंत कामीरे, आरोपी क्र.२ सागर शामराव कामीरे, आरोपी क्र.३ आनंदा उर्फ दादासो बाळासो गडदे, आरोपी क्र.४ लखन उर्फ स्वप्नील सोनाजी हाके, आरोपी क्र.५ विशाल उर्फ हाणमा संजय कामीरे, आरोपी क्र.६ बजरंग रामचंद्र कामीरे व आरोपी क्र.७ संजयकुमार बळवंत कामीरे यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५(१) अन्वये त्यांचे विरुध्द लावण्यात

आलेल्या भा.द.वि. कलम ३०७, ३२३, ३२४, ५०४, ५०६, १४३, १४७, १४८ सह १४९ अन्वयेच्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२ आरोपी क्र.१ ते ७ यांचे वैयक्तीक बंधपत्र व जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे.

३ फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम ४५२ नुसार, अपिल कालावधीनंतर, मुद्देमाल म्हणजे आरोपी व जखमी यांचे कपडे, कापसाचे बोळे व खिळे मारलेली लाकडी काठी, एक कळकाची काठी, लोखंडी गज, मुल्यहीन असलेने त्यांचा नाश करण्यात यावा.

४ आरोपी क्र.१ ते ७ यांनी प्रत्येकी रक्कम रु.५०,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनकदबा संदर्भात फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये पुर्तता करणेची आहे.

(येणेप्रमाणे न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

ACHALA HARSHAVARDHAN KASHIKAR

Digitally signed by ACHALA HARSHAVARDHAN KASHIKAR
Date: 2026.04.13 15:04:23 +0530

(ए. एच. काशीकर)

दिनांक १३/०४/२०२६    तदर्थ जिल्हा न्यायाधीश क्र.१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,इस्लामपूर.

**Certificate**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Sou.S.W.Pathan, Steno (Grade-1) |
| Court | : | Adhoc-District Judge-1, Islampur |
| Date | : | 13/04/2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 13/04/2026 |
| Order uploaded on | : | 13/04/2026 |